# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,
भाईंदर (प.), ता.जि. ठाणे, 401 101.

## प्रसिध्दीपत्रक

**विषय :- मिरा भाईंदर शहरातील बचत गटामार्फत टाकाऊ कपडयापासुन तयार केलेल्या कापडी पिशव्यांचे प्रदर्शन व विक्री मॅक्सस मॉल मध्ये दि. 19 व 20 फेब्रुवारी 2022 रोजी आयोजीत केलेबाबत.**

मिरा भाईंदर शहरामध्ये Single Use प्लास्टीक वर बंदी घालण्यात आलेली असून Carry Bag, थर्माकोल असे एक वेळ वापरण्यात येणारे प्लास्टीकचे ग्लास, डब्बे इत्यादी यावर केंद्र शासनाच्या व महाराष्ट्र शासनाच्या धोरणानुसार बंदी घालण्यात आलेली आहे. त्या अनुषंगाने मिरा भाईंदर शहरामधील भाजी विक्रेते, फळ विक्रेते, किरकोळ दुकानदार, मेडीकल व हॉटेल व्यवसायीक तसेच ऑनलाईन पार्सल देणारे व्यवसायीक या सर्वांना प्लास्टीकचा वापर केल्यास पहिल्या वेळी 5,000/- रु., दुस-या वेळी 10,000/- व तिस-या वेळी 25,000/- इतका दंड आकारण्यात येत आहे. या व्यवसायीकांना महापालिकेमार्फत वेळोवेळी आवाहन करण्यात आलेले आहे कि, आपण कापडी पिशव्यांचा वापर करावा.

वरील सर्व व्यवसायीकांना स्वस्तामध्ये कापडी पिशव्या उपलब्ध व्हाव्या या उध्देशाने महापालिकेमार्फत मॅक्सस मॉल या ठिकाणी दि. 19 व 20 फेब्रुवारी 2022 रोजी कापडी पिशव्यांचे प्रदर्शन भरविण्यात येत आहे. शहरातील बचत गटांच्या महिलांनी टाकाऊ कपडयापासुन बनविलेल्या स्वस्तामधील कापडी पिशव्या या ठिकाणी उपलब्ध होणार आहेत. 3/- रु. पासुन ते 15/- रु. पर्यंत उपलब्ध होणा-या या कापडी पिशव्या बचत गटांना वर्षभराची ऑर्डर दिल्यास सातत्याने त्याच दराने कापडी पिशव्यांचा पुरवठा बचत गटामार्फत करण्यात येईल व शहरातील विविध कापड उद्योगांना देखिल आवाहन करण्यात येते कि, आपल्याकडील टाकाऊ कापड बचत गटांना उपलब्ध करुन द्यावे.

त्यामुळे शहरातील सर्व व्यवसायीकांना महापालिकेमार्फत आवाहन करण्यात येते कि, सदर ठिकाणी उपलब्ध असणा-या कापडी पिशव्यांच्या ऑर्डर आपण बचत गटांना द्याव्या व प्लास्टीक Caryy Bag चा वापर कटाक्षाने टाळावा.

**(रवि पवार)**
**उप-आयुक्त (सार्व. आरोग्य)**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**